Estd.1962
NACC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, सर्व अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, सद्या संपूर्ण जगभरात पसरत असलेल्या करोना (Covid -19) विषाणूचा प्रसार इतर देशाप्रमाणे भारतातील इतर राज्यासह महाराष्ट्र राज्यातही झाला आहे.

यास्तव, शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, सर्व अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय सेवकांची हजेरी ही सध्या बायोमेट्रिक मशिनमध्ये थंब इम्प्रेशनद्वारे संगणक प्रणालीमध्ये नोंदवली जाते. करोना (Covid -19) विषाणू संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व संसर्ग पसरू नये याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून सोमवार, दि. १६ मार्च, २०२० पासून पुढील आदेश होईतोपर्यत शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवकांची बायोमेट्रिक थंब इम्प्रेशनद्वारे घेतली जाणारी दैनंदिन हजेरी स्थगित करण्यात येत आहे. यामुळे सर्व अधिविभागप्रमुख, विभागप्रमुख यांनी आपापल्या विभागातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवकांची कार्यालयास असणारी दैनंदिन उपस्थितीची नोंद असलेली पुर्वीप्रमाणेच हजेरीपत्रके लेट मस्टरसह आपापल्या अधिविभाग व विभागात ठेवावयाची असून दर महिन्याच्या १ तारखेला सदरचे हजेरी पत्रक हे आस्थापना विभागाकडे विभाग प्रमुख /उपकुलसचिव/अधिविभाग प्रमुख यांच्या स्वाक्षरीसह जमा करावयाचे आहे. हजेरीपत्रकाचा नमुना सोबत जोडलेला आहे.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/७९१
दिनांक : १५ मार्च, २०२०

प्रति,

१. मा.कुलगुरू /मा.प्र—कुलगुरू/मा.कुलसचिव/मा.संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ/मा.वित्त व लेखाधिकारी यांचे कार्यालयास
२. सर्व अधिविभागप्रमुख / समन्वयक / विभागप्रमुख यांना : सदरचे परीपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांचे निदर्शनास आणावे.
३. प्रभारी संचालक, संगणक केंद्र यांना : बायोमॅट्रिक मशिन पुढील आदेश होईतोपर्यत बंद ठेवणे बाबत व त्या अनुंषगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.